# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मविनिआ

केंद्र क्र. १,१३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५.
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@mercindia.org.in वेबसाईट: www. mercindia.org.in


## जाहीर सूचना

प्रकरण क्र.२०१०/८५ दिनांक: १० डिसेंबर, २०१०

## विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १५ च्या उप-कलम(५)च्या खंड (ए) अन्वये सूचना

१. **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण), प्लॉट क्र. जी/९, प्रकाशगड, प्राध्यापक अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू.), मुंबई – ४०००५१** यांनी सध्या मुळा प्रवरा विद्युत सहकारी सोसायटी लिमिटेड (मुळा प्रवरा सोसायटी), करीत असलेल्या वीज पुरवठ्याच्या क्षेत्रात (अहमदनगर जिल्ह्यातील ५ तालुक्यातील सुमारे १८३ गावांमध्ये) वितरण परवानाधारक म्हणून विजेचे वितरण करण्यासाठी मंजुरी मिळण्याकरिता आयोगाकडे अर्ज केला. महावितरण कंपनीने त्यांच्या वितरण परवान्याची मागणी मंजुर करणाच्या अर्जाची नोटीस, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या बाबी व तपशीलासह दि. ५ डिसेंबर, २०१० च्या 'टाइम्स ऑफ इंडिया', 'इंडियन एक्सप्रेस', 'लोकमत टाइम्स', 'सकाळ', 'लोकमत' आणि 'सार्वमत' मध्ये प्रसिद्ध केली. सदर नोटीशीद्वारे जनतेकडून वरील परवाना देण्यासंबंधी हरकती/सूचना मागविण्यात आल्या आहेत. वरील परवान्यासाठीच्या अर्जाची प्रत त्यासोबतच्या जोडपत्रांसह आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेत स्थळावर पाहता येईल किंवा कोणत्याही व्यक्तींला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ मध्ये विहित करण्यात आलेल्या कार्य पद्धतीचे पालन करुन पाहता येईल.

२. महावितरण कंपनीने प्रसिद्ध केलेल्या वरील नोटीशीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या हरकती विचारात घेऊन महावितरण कंपनीला वरीलप्रमाणे परवाना मंजूर करावयाचा किंवा नाही, याबाबत आयोग निर्णय घेईल.

३. ही नोटीस, विद्युत अधिनियम, २००३च्या कलम १५च्या उप-कलम (५)खाली, वरील प्रस्तावानुसार महावितरण कंपनीला वितरण परवाना, सर्व सूचना/हरकती विचारात घेण्याच्या अधीन राहून, मंजूर करण्याच्या प्रस्तावासंबंधी देण्यात येत आहे. महावितरण कंपनीला. सध्या मुळा-प्रवरा सोसायटीकडून विजेचा पुरवठा करण्यात येत असलेल्या क्षेत्रासाठी (अहमदनगर जिल्ह्यातील ५ तालुक्यातील सुमारे १८३ गावे) वितरण परवाना देण्याच्या प्रस्तावासंबंधी आपल्या सूचना / हरकती कोणीही व्यक्ती **शुक्रवार, ७ जानेवारी, २०११ पर्यंत** निम्न स्वाक्षरीकाराकडे पाठवू शकेल.

४. ज्या व्यक्तींना सूचना/हरकती पाठवावयाच्या असतील त्यांनी सूचना किंवा हरकती वरील पत्त्यावर इंग्रजी अथवा मराठीत (६ प्रतींमध्ये) पाठवाव्यात व त्यामध्ये पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता, पिन कोड आणि असल्यास ई-मेलचा उल्लेख करावा. तसेच जर कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने सूचना/हरकती / पाठविणाऱ्या व्यक्तीला आपले म्हणणे व्यक्तीश: मांडावयाचे असेल तर तसे देखील त्यामध्ये नमूद करण्यात यावे, म्हणजे **यशवंतराव चव्हाण ऑडिटोरियम, म्युनिसिपल कॉन्सिल, शिवाजी रोड, श्रीरामपूर-४१३ ७०९येथे शुक्रवार, दि १४ जानेवारी २०११ रोजी सकाळी ११.०० वाजता** होणाऱ्या जाहीर सुनावणीच्या वेळी त्यां व्यक्तीस त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात

**दिनांक: १० डिसेंबर २०१०**
**ठिकाण : मुंबई**

**सही/-**
**(के. एन. खवारे)**
**सचिव, मविनिआ**

Size: 15H x 12W